# अध्यादेश काढण्यासाठी सरकारने वेळकाढूपणा केला

## सुप्रिया सुळेंचा राज्य सरकारवर निशाणा



**बारामती :** सरकार हा अध्यादेश लवकरही काढू शकले असेत, पण त्यासाठी जरांगेंना मुंबईत यावं लागलं. मग या सरकारने अध्यादेश काढला, त्यामुळे हे सरकार किती असंवेदनशील आहे, हे यावरुन स्पष्ट झालं, असं म्हणत राष्ट्रवादी शरद पवार गटाच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी प्रतिक्रिया दिली आहे. मराठा आरक्षणासाठी मनोज जरांगे यांनी ज्या मागण्या केल्या होत्या, त्याचा अध्यादेश सरकारने काढला असून तो मनोज जरांगे यांच्या हाती सुपूर्द केला. त्याच पार्श्वभूमीवर सुप्रिया सुळे यांनी मनोज जरांगे यांचे आभार देखील मानले आहेत.

तसेच धनगर, मुस्लिम आणि लिंगायत समाजाच्या देखील आरक्षणाच्या मागण्या आहेत, असं देखील सुप्रिया सुळे यांनी यावेळी म्हटलं. मुस्लिम धनगर समजाला जे सरकार न्याय देईल, त्यांच्या सोबत आम्ही ताकदीने उभे राहू. त्यांनी नाही दिला तर आम्ही आमचं सरकार आल्यावर न्याय देऊ, अशी प्रतिक्रिया सुप्रिया सुळे यांनी दिली.

मराठा आरक्षणाच्या मुद्द्यावर अध्यादेश

मागील अनेक महिन्यांपासून सुरु असलेला मराठा आंदोलनाचा प्रश्न अखेर राज्य सरकारकडून उत्तरी काढण्यात आला. मराठा आरक्षणासाठी मनोज जरांगे यांनी ज्या काही मागण्या केल्या होत्या, त्या मागण्या राज्य सरकारकडून मान्य करण्यात आल्या आहेत. तसेच त्यासंदर्भात अध्यादेश देखील काढण्यात आलाय. पण का केवळ अध्यादेश असून आरक्षण अद्याप मिळालेलं नाही, असा सूर विरोधकांनी लावला आहे. त्यामुळे पुन्हा एकदा मराठा आरक्षणाच्या मुद्द्यावरुन राजकीय खळबळ माजण्याची देखील शक्यता वर्तवण्यात येतेय.

यंत्रणांचा गैरवापर करुन पक्ष फोडले जातात - सुप्रिया सुळे

बिहारमधील राजकीय घडामोडींना सध्या बराच वेग आलाय. त्यातच आता नितीश कुमार हे भाजपसोबत सत्ता स्थापन करणार असल्याची चर्चा सध्या बिहारच्या राजकीय वर्तुळात आहे. यावर प्रतिक्रिया देताना सुप्रिया सुळे यांनी म्हटलं की, यंत्रणांचा गैरवापर करुन पक्ष फोडले जातात. सत्ताधारी दडपशाही करीत असून त्यांच्या विरोधात आम्ही लढत राहू.

ट्रिपल इंजिन सरकार असंवेदनशील - सुप्रिया सुळे

सध्या राज्यात दुष्काळग्रस्त परिस्थिती आहे. त्याकडे राज्य सरकारचं लक्ष नाही. पाऊस कमी झाला आहे, त्याचं नियोजन सरकारनं करावं. लोक भेटू सांगत आहेत की छावण्या काढा. छावण्या काढण्याची गरज आहे. पण हे ट्रीपल इंजिन सरकार असंवेदनशील असल्याची टीका सुप्रिया सुळे यांनी केलीये.



### ऑस्ट्रेलियन खुल्या टेनिस स्पर्धेतील विजयाबद्दल

## रोहन बोपण्णाचे पंतप्रधानांनी केले अभिनंदन

**दिल्ली :** ऑस्ट्रेलियन खुल्या टेनिस स्पर्धेतील विजयाबद्दल टेनिसपटू रोहन बोपण्णा याचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अभिनंदन केले आहे.

पंतप्रधानांनी‶ वर पोस्ट केले:

वयाची कोणतीही अडचण नसते ! हे विलक्षण प्रतिभावान रोहन बोपण्णा याने वेळोवेळी दाखवून दिले आहे.

ऑस्ट्रेलियन खुल्या टेनिस स्पर्धेत मिळालेल्या ऐतिहासिक विजयाबद्दल त्याचे अभिनंदन.

आपले धैर्य, कठोर परिश्रम आणि चिकाटीच आपल्या क्षमतांना परिभाषित करते, याचे सुंदर स्मरण करून देणारा त्याचा हा प्रवास उल्लेखनीय आहे. त्याला पुढील वाटचालीसाठी खूप खूप शुभेच्छा.''

# तब्बल ६० वर्षांनी टीम इंडिया पाकिस्तान दौऱ्यावर

## केंद्र सरकारचा हिरवा कंदील

**नवी दिल्ली :** मुंबईवर दहशतवादी हल्ल्यापासून भारत आणि पाकिस्तानमधील संबंध ताणले गेले. याचा परिणाम मैदानातील खेळावरही झाला. त्यामुळे क्रिकेटचे अनेक सामने पाकिस्तान वगळता वेगवेगळ्या देशांमध्ये होत असतात. मात्र आता ६० वर्षांनी भारतीय टेनिस संघ पाकिस्तानच्या दौऱ्यावर जाणार आहे. यासाठी केंद्र सरकार परवानगी दिली असून आगामी डेव्हिस चषकाच्या सामन्यासाठी टीम इंडिया पाकिस्तानला जाणार आहे. पाकिस्तान उच्चायुक्तालयाने भारतीय डेव्हिटीज कप संघातील



आणि सपोर्ट्स स्टाफसाठी व्हिसाही जारी केला असून टीम इंडिया आणि पाकिस्तान यांच्या डेव्हिस चषक स्पर्धेतील गट-१ सामना ३ आणि ४ फेब्रुवारी रोजी इस्लामाबाद येथे खेळवला जाणार आहे.

आंतरराष्ट्रीय टेनिस महासंघाने (आयटीएफ) पाकिस्तानसोबतचा होणारा डेव्हिस कपचा सामना इतरत्र हलवण्याची भारताची मागणी फेटाळली होती. त्यानंतर अखिल भारतीय टेनिस असोसिएशनने (एआयटीए) भारताच्या संघाला पाकिस्तानमध्ये खेळण्याची परवानगी द्यावी अशी विनंती सरकारकडे केली होती. हा सामना खेळण्यासाठी भारताचा संघ गेला नसता तर आयटीएफ पाकिस्तान वॉकओव्हर देऊ शकला असता. मात्र आता सरकारने परवानगी दिल्याने दोन्ही संघात सामना होईल आणि विजयी संघ स्पर्धेत पुढे जाईल.

**तब्बल ६० वर्षांनंतर पाकिस्तान दौरा**

**दरम्यान, भारतीय संघ १९६४ मध्ये डेव्हिस कप खेळण्यासाठी पाकिस्तानला गेला होता. त्यावेळी भारताने पाकिस्तानचा ४-00 असा पराभव केला होता. त्यानंतर, २०१९ मध्ये कझाकस्तानमध्ये दोन्हा संघातील सामना ठेवण्यात आला होता. त्यावेळी, एआयटीएने राजकीय तणावाचे कारण देत आयटीएफला सामना इतरत्र हालवण्याची विनंती केली होती. मात्र एआयटीएची ही मागणी मान्यही झाली होती. मात्र आता ही मागणी अमान्य झाल्याने भारताला पाकिस्तान दौऱ्यावर जावेच लागेल आणि त्यासाठी सरकारनेही परवानगी दिली आहे.**

**सुमित नागल आणि शशिकुमार मुकुंद यांची माघार**

सुमित नागल आणि शशिकुमार मुकुंद यांनी पाकिस्तानमध्ये होणाऱ्या डेव्हिस कपमधून माघार घेतली आहे. त्यामुळे राजकुमार रामनाथन आणि एन. एके विरुद्ध श्रीराम बालाजी एकेरी सामने खेळतील अशी शक्यता आहे. तर दुसरीकडे युकी भांबरी दुहेरीत खेळताना दिसणार आहे. त्याच्यासोबत निकी पुनाचा किंवा साकेत मानेहे मैदानात उतरतील. डेव्हिस कपमधून निवृत्त झाल्यास रोहन बोपण्णा खेळताना दिसणार नाही.

### भरधाव येणाऱ्या कारने चारचाकीसह दुचाकी गाड्यांना उडवलं

साताऱ्यातील यवतेश्वर रोडवर भरधाव येणाऱ्या कारने चारचाकीसह दुचाकी गाड्यांना उडवलआहे. या अपघातामुळे ३ ते ४ जण गंभीररित्या जखमी झाल्याची माहिती आहे. या अपघातात गाड्यांचंही मोठं नुकसान झालं आहे. महिलेचे कार गाडीवरील नियंत्रण सुटल्याने हा अपघात झाला असल्याचे बोलले जात आहे. सध्या जखमींना सातारा जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे. अपघातग्रस्तांची अद्याप ओळख पटू शकलेली नाही. पोलिस या घटनेचा तपास करत आहेत. या मार्गावर अपघात झाल्याने वाहतूक काहीकाळ ठप्प झाली होती. सध्या अपघातग्रस्त वाहनं रस्त्याच्या बाजूला करण्याचं काम वाहतूक पोलिस करत आहेत.

## मराठा आरक्षणाच्या घोषणेनंतर राज ठाकरेंचा सरकारला टोला

### वाचा जरांगे पाटलांना उद्देशून काय म्हणाले



**मुंबई :** मनोज जरांगे पाटील यांच्या मागण्या मान्य करत सरकारने मराठा आरक्षणाची घोषणा केली. सरकारने त्या संदर्भातील अधिसूचनाही काढली आहे. आरक्षण मिळेपर्यत मराठ्यांना ओबीसींचे लाभ देण्याची घोषणा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केली. यासह मराठ्यांना ओबीसींच्या सर्व सवलतीही दिल्या जाणार आहेत. यावर आता विविध प्रतिक्रिया उमटत आहेत. अनेक मराठा नेत्यांनी सरकारच्या या घोषणेचे स्वागत केले, तर छगन भुजबळ यांच्यासारख्या ओबीसी नेत्यांनी याचा विरोध केला आहे.

काय म्हणाले राज ठाकरे : महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी देखील यावर आपली प्रतिक्रिया दिली. राज ठाकरेंनी 'एक्स' वर पोस्ट करत मनोज जरांगेंचं अभिनंदन केले. मात्र आपल्या पोस्टमध्ये त्यांनी सरकारला टोला मारला आहे. राज ठाकरे मनोज जरांगे पाटलांना उद्देशून म्हणाले, ''सरकारने तुमच्या सगळ्या मागण्या मान्य केल्या. आता फक्त आरक्षण मिळायचे बाकी आहे. ते कधी मिळणार हे पण एकदा मुख्यमंत्र्यांना विचारा, म्हणजे आपल्या मराठा बांधवांना, भगिनींना ही खरी परिस्थिती समजेल. लोकसभा निवडणुकीआधी पारदर्शकता येईल ही अपेक्षा.''

छगन भुजबळांचा विरोध : राज्य सरकारच्या शिष्टमंडळानं शुक्रवारी रात्री मनोज जरांगेंची भेट घेतली. या दोघांमध्ये सुमारे तीन तास चर्चा झाली. यावेळी सरकारनं मनोज जरांगेंना सुधारित अधिसूचना सुपूर्द केली. या अधिसूचनेत सग्या-सोयऱ्यांच्या मुद्द्याचा समावेश आहे. ओबीसी नेते छगन भुजबळ यांनी मात्र सरकारच्या या निर्णयाचा विरोध केला आहे. त्यांनी जरांगे पाटलांवर झुंडशाहीने नियम, कायदे बदलल्याचा आरोप केला. तसेच १६ फेब्रुवारीपर्यत अधिसूचनेवर लाखोंच्या संख्येने हरकती पाठवण्याचे आवाहन त्यांनी केले आहे.


# मराठवाड्यातील उद्योजकांसाठी सवलतीचा वीजपुरवठा 'पॅटर्न' आणणार : उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**नागपूर :** उद्योग व्यवसाय तुलनेने कमी असणाऱ्या विदर्भ, मराठवाडा या भागात उद्योग व्यवसाय सुरू करणाऱ्या समूहांना सवलतीच्या दरात वीज पुरवठा करणारा पॅटर्न महाराष्ट्रात लवकरच राबविला जाईल, असे सूतोवाच उपमुख्यमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज येथे केले.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या प्रांगणात खासदार औद्योगिक महोत्सव अर्थात ॲव्हाँटेज विदर्भ या तीन दिवसीय कार्यक्रमाची सुरुवात झाली आहे. विदर्भातील मोठ्या उद्योगांचे प्रदर्शन तसेच उद्योजकांचे संमेलन यानिमित्ताने आयोजित करण्यात आले आहे. या कार्यक्रमाच्या उद्घाटनानंतर प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते.

खासदार औद्योगिक महोत्सव नागपूर अर्थात ॲव्हाँटेज विदर्भ उद्योग व्यवसायाला चालना देण्यासाठी निर्माण केलेले व्यासपीठ असून विदर्भातील मोठ्या उद्योग समूहाचे प्रदर्शन आणि गुंतवणुकीचे संमेलन सध्या नागपूर येथे सुरू आहे. असोसिएशन फॉर इंडस्ट्रियल डेव्हलपमेंट यांच्यामार्फत या विचार मंथनाचे व प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमाच्या मंचावर केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी, सांस्कृतिक कार्य मंत्री सुधीर मुनगंटीवार, नागपूर विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी, व्हीएनआयटीचे संचालक प्रमोद पडोळे, रामटेकचे खासदार कृपाल तुमाने, भंडाऱ्याचे खासदार सुनील मेंढे, गडचिरोलीचे खासदार अशोक नेते, खासदार अनिल बोंडे, माजी केंद्रीय मंत्री खासदार प्रफुल्ल पटेल, माजी खासदार व



उद्योजक अजय संचेती, आमदार आशिष जायस्वाल, नागपूर महानगरपालिकेचे आयुक्त डॉ.अभिजीत चौधरी, जिल्हाधिकारी डॉ. विपिन इटनकर आदी उपस्थित होते.

उपमुख्यमंत्र्यांनी यावेळी गुंतवणुकदारांशी संवाद साधला. ते म्हणाले, उद्योग व्यवसायामध्ये सर्वाधिक महत्वाचा वीजपुरवठा असून अन्य राज्याच्या तुलनेत महाराष्ट्रात उद्योग व्यवसाय उभारताना यामध्ये सवलत मिळण्याची मागणी योग्य आहे. त्यामुळे येणाऱ्या काळात या संदर्भातील एक पॅटर्न आम्ही तयार करीत आहोत. याचा फायदा उद्योग समूहांना होईल. मात्र, मराठवाडा-विदर्भ यासारख्या मागास भागात उभारल्या जाणाऱ्या उद्योगांनाच या पॅटर्नचा लाभ होईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

कोणताही उद्योग उभारण्यासाठी वीज, पाणी, मध्यवर्ती ठिकाण व अन्य पायाभूत सुविधांची गरज असते.केंद्रीय रस्ते, महामार्ग व दळणवळण मंत्री नितीन गडकरी यांच्या माध्यमातून विदर्भातील रस्त्यांचे जाळे मजबूत व दीर्घकाळासाठी उत्तम झाले आहे. समृद्धी महामार्गामुळे एक वातावरण निर्मिती झाली आहे. त्यामुळे औद्योगिक क्षेत्रामध्ये आवश्यक असणारी पुरवठा साखळी विदर्भात निर्माण झाली आहे.मोठे लॉजिस्टिक क्लस्टर आम्ही नागपूरमध्ये निर्माण करणार आहोत. लॉजिस्टिक कॅपिटल म्हणून नागपूरला जगामध्ये पुढे आणायचे आहे.

समृद्धी महामार्गाचा विस्तार गोंदिया, गडचिरोली, चंद्रपूरकडे होणार आहे. नागपूर पासून मुंबई प्रमाणे गोवा महामार्ग आम्ही तयार करीत आहोत. त्याला शक्तीपीठ महामार्ग संबोधले जाईल. नागपूरचे नवीन विमानतळ जागतिक मानांकनाचे असेल याकडे आम्ही लक्ष वेधले आहे. सोबतच अमरावती, अकोला विमानतळाला अद्यावत करणार आहोत. गडचिरोलीमध्येही आमचे विमानतळ तयार होत आहे. चंद्रपूरचेही विमानतळ आम्ही लवकरच पूर्णत्वास घेऊन जाऊ, त्यामुळे रस्ते लोहमार्ग व विमान मार्गाने नागपूर व विदर्भ प्रत्येक प्रदेशाशी जोडला गेला आहे.

चार्मोशी पासून 'वॉटर वे' तेलंगणा पर्यत नेण्याचा आमचा मानस आहे. वैनगंगा ते नळगंगा ५५० किलोमीटरचा कॅनॉल आम्ही तयार करीत आहोत. २०२४ मध्ये या कामाला सुरुवात होऊन सात वर्षात हा प्रकल्प पूर्ण व्हावा अशी आमची अपेक्षा आहे. यामुळे विदर्भातील जास्तीत जास्त शेतीला पाणी पुरवठा करता येईल.

गडचिरोली जिल्ह्यामध्ये लोह उद्योगाचा पाया रचला असून याठिकाणी उत्तम भविष्य दिसून येत आहे. मुख्यमंत्री असताना सुरू केलेला लोह उद्योग आता विस्तारित होत असून लवकरच गडचिरोली पोलाद उद्योगाचे हब होईल याची मला खात्री आहे.

केवळ नागपूर नव्हे संपूर्ण विदर्भातील सर्व जिल्हे विकसित व्हावे व त्यादृष्टीचे नियोजन, क्लस्टर निर्मितीला आणि प्राधान्य देत आहोत. याशिवाय कोळशावर तयार होणाऱ्या गॅसपासून (कोल गॅसीफिकेशन ) घरगुती वापराच्या गॅस निर्मिती संदर्भात चंद्रपूरमध्ये काही प्रयोग यशस्वी होण्याची शक्यता आहे.यातून मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मिती होणार आहे.

भांडवल, पायाभूत सुविधा यासोबतच मनुष्यबळांची आवश्यकता ही महत्त्वपूर्ण ठरते. त्यामुळे नागपूरमध्ये मनुष्यबळ कौशल्य युक्त व्हावे यासाठी आमचा सातत्याने प्रयत्न सुरू आहे. संरक्षण, पर्यटन या क्षेत्रातही मोठे उद्योग उभारण्याची विदर्भात संधी आहे.स्टार्टअप इकोसिस्टम डेव्हलप करण्याचेही आमचे प्रयत्न सुरू आहे.

नागपूर येत्या काळात देशातील गुंतवणुकीचे हब बनणार : नितीन गडकरी

विदर्भाच्या विकासासाठी काय करता येईल,याच्या विचार मंथनासाठी ॲव्हाँटेज विदर्भ व खासदार औद्योगिक महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. विदर्भात पायाभूत सुविधा निर्माण करण्यासाठी आमचा प्रयत्न सुरू आहे.गडचिरोलीपासून वाशिम पर्यत आणि बुलडाण्यापासून गडचिरोलीपर्यत आम्ही चांगले रस्ते तयार केले.

पाणी, वीज, पायाभूत सुविधा, विस्तीर्ण रस्ते, तंत्रज्ञान यासह केंद्रातून कोणतीही मदत लागल्यास मी तत्पर आहे. राज्यासाठी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तयार आहेत. सोबतीला राज्याचे माजी मंत्री तसेच केंद्रीय सूक्ष्म लघू मध्यम मंत्री नारायण राणे स्वत: या ठिकाणी उपस्थित आहे .त्यामुळे आता विदर्भात विकास झाला पाहिजे. गुंतवणूकदारांनी आरोग्य, अभियांत्रिकी, औषधी,पर्यटन, हॉटेल व्यवसाय व अन्य लॉजिस्टिक सारख्या मोठ्या क्षेत्रात गुंतवणुकीसाठी पुढे यावे असे आवाहन त्यांनी यावेळी केले.

गडकरी फडणवीस यांचे डबल इंजिन विदर्भाचा सुवर्णकाळ : नारायण राणे

कार्यक्रमाचे अध्यक्षीय भाषण केंद्रीय मंत्री नारायण राणे यांनी केले. ते म्हणाले, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे विदर्भाचा पूर्ण अभ्यास आहे. कुठे काय निर्माण होऊ शकते, कोणत्या जिल्ह्याला कोणता उद्योग उपयोगी पडू शकते यशस्वी होऊ शकते, याची माहिती असणारे हे नेतृत्व आहे. त्यामुळे विदर्भाच्या विकासाचा हा सुवर्णकाळ आहे.

गडकरींच्या परिस्पर्शात विदर्भ विकासाची सूत्रे आहेत : मुनगंटीवार

तत्पूर्वी, राज्याचे सांस्कृतिक कार्य व वने मंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी उपस्थित गुंतवणुकदारांना संबोधित केले. विदर्भात वन, पाणी,वीज, जागा उपलब्ध आहे. त्यामुळे तुम्हाला काय सुविधा हवी ते सांगा. आम्ही सगळे तत्पर आहोत. ज्यांच्या कर्तुत्वाला अवघ्या भारताने सलाम केला असे केंद्रीय मंत्री नितीन गडकरी या ठिकाणी मदतीला तयार आहेत. त्यांनी ज्या कामाला हात लावला त्याचे सोने होते. त्यामुळे विदर्भात गुंतवणुकीसाठी पुढे यावे, असे आवाहन त्यांनी केले.

# 'OBC आरक्षणाला धक्का

## आता लाख मराठाऐवजी, लाख ओबीसी' पंकजा मुंडेंचं आवाहन



**बीड :** शिंदे सरकारने मराठा आरक्षणाचा प्रश्न निकाली काढत मराठा आरक्षणाला मान्यता दिली आहे. त्यानंतर ओबीसी नेत्यांसह कायदे तज्ज्ञ यांनी आपल्या प्रतिक्रिया देण्यास सुरुवात केली आहे. सरकारच्या अधिसुचनेनुसार कुणबी जातप्रमाणपत्र मराठा समाजाला देता येणार आहे. त्यामुळे ओबीसी नेते यांनी आपली भूमिका स्पष्ट केली आहे. बीडमध्ये भाजप नेत्या पंकजा मुंडे यांनीही मनोज जरांगे पाटील यांचं अभिनंदन करत एक आवाहन केलं आहे. त्या म्हणाल्या की, आता कुणबी प्रमाणपत्रे घेऊन मराठा समाजातील एक पिढी आता ओबीसीमध्ये आली आहे. आता त्या लोकांनी एक मराठा लाख मराठाऐवजी एक ओबीसी लाख ओबीसी म्हणावं, असं आवाहन त्यांनी जरांगेसह मराठा आंदोलनकर्त्यांना केलं आहे.

त्या पुढे म्हणाल्या की, सरकारने मराठा आरक्षणाबाबतीत काढलेल्या अध्यादेशाला १६ फेब्रुवारीपर्यत आक्षेप नोंदवण्याची संधी देण्यात आली आहे. त्यामुळे या काळात काय आक्षेप येतील आणि ते कायद्यात बसतील का? हे पाहावे लागणार आहे. त्याशिवाय त्यांनी मराठा आरक्षणासंदर्भात आली भूमिका स्पष्ट करत सांगितलं की, मराठा समाजाला कायद्यात बसणारे आरक्षण मिळाले पाहिजे ही माझी भूमिका कायम आहे. त्यामुळे जेव्हा या अध्यादेशावर शिक्कामोर्तब होणार तेव्हा खऱ्याअर्थाने अभिनंदन करावे लागणार आहे.

तर मराठा आरक्षणानंतर भाजप नेत्या पंकजा मुंडे पुढे म्हणाल्या की, मराठाला आरक्षण देताना ओबीसीच्या आरक्षणाला धक्का लागणार नाही असं वारंवार सांगण्यात येत होतं. मात्र ओबीसीच्या आरक्षणाला धक्का लागलाच आहे अशी खंतही त्यांनी बोलून दाखवली आहे.

त्या पुढे अशाही म्हणाल्या की, पूर्वी विदर्भातील लोकांनी आणि पश्चिम महाराष्ट्रातील नागरिकांनाही कुणबी जातप्रमाणपत्र घेतले. मात्र मराठवाड्यातील नागरिकांनी ते कधीही घेतलं नाही. विदर्भ, पश्चिम महाराष्टातील लोकांसोबत मराठवाड्यातील लोकांनी तेव्हाच प्रमाणपत्र घेतलं असतं तर आजही परिस्थिती निर्माण झाली नसती. पण त्यांना आता पुढील पीढीसाठी कुणबी प्रमाणपत्र हवं आहे. त्यामुळे नाही नाही म्हणतानाही ओबीसीला धक्का लागलाच आहे. आता यापुढे दोन्ही समाजातील वितुष्ट संपुष्टात यावं आणि हा निर्णय टिकल्यास जातीवाचक भांडण होऊ नयेत, अशी अपेक्षाही पंकजा मुंडे यांनी बोलून दाखवली.